# प्रेसनोट

दिनांक १९/०६/२०२३

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा ”**

**“ स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणा-यांवरती कारवाई करुन ०२ पिडीत महिलांची सुटका केलेबाबत ”**

मा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथील हॉटेल व लॉजेसच्या नावाखाली काही इसम स्वतःचे आर्थिक फायदयासाठी अवैध रित्या मुलींना जास्त पैशाचे अमिष दाखुन त्यांना लॉजमध्ये ठेवुन वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडतात. अशी गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्राप्त झाली.

अशा इसमांची गोपनीय माहिती काढुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक १७/०६/२०२३ रोजी महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत बागडे वस्ती, पुणे नाशिक हायवे रोड, कुरुळी ता. खेड जि. पुणे येथील हॉटेल सरकार रेस्टॉरंट ॲन्ड लॉजींग येथे बनावट ग्राहकाकरवी वेश्यागमनासाठी मुलीबाबत विचारणा केली असता हॉटेल सरकार रेस्टॉरंट ॲन्ड लॉजींगचे चालक व मॅनेजर हे संगनमत करुन मुलींना लॉजमध्ये ठेवुन मुलींकडुन त्यांचेकडुन जास्त पैशाचे अमिष दाखुन वेश्याव्यसाय करुन घेतला जात आहे अशी खात्री झाल्याने पोलीसांनी महाळुंगे एमआडीसी पोलीस स्टेशन हद्दीत **हॉटेल सरकार रेस्टॉरंट ॲन्ड लॉज** बागडे वस्ती, पुणे नाशिक हायवे रोड, कुरुळी ता. खेड जि. पुणे येथे सापळा रचुन छापा टाकुन आरोपी नामे १) **अजित संजीवनाल गौतम,** वय २१ वर्षे, सध्या रा. महाळुंगे एमआडीसी पोलीस स्टेशन हद्दीत बागडे वस्ती, पुणे नाशिक हायवे रोड, कुरुळी ता. खेड जि. पुणे येथील हॉटेल सरकार रेस्टॉरंट ॲन्ड लॉजींग मुळ रा.भवानी खेडा, दरहेटा, उन्नाव, उत्तर प्रदेश (लॉज मॅनेजर) पाहिजे आरोपी २) **सुधाकर संजीवा शेट्टी**, वय ४९ वर्षे, रा.फ्लॅट नं ३०२ ए विंग, राधाकृष्ण कॉम्पलेक्स, तिरुपती चौक इंद्रायणी नगर भोसरी पुणे (लॉज चालक) यांच्या ताब्यातुन दोन मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन २ आरोपी विरुध्द महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं.३३६/२०२३ भादंवि कलम ३७०(३) ३४ सह अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. संजय शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी सो, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) सतीश माने सो यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, धैर्यशिल सोळंके, विजय कांबळे, पोलीस अमंलदार, सुनिल शिरसाट, सुधा टोके, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, संगीता जाधव, सोनाली माने यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड